क्रमांक : २४४८ / ब कक्ष
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई – ४०० ०३२
दिनांक : २० फेब्रुवारी, २०२४

## :: परिपत्रक ::

विषय :- महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२३ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनातील दिनांक २१ व २२ डिसेंबर, २०२३ रोजीच्या प्रश्नांबाबत...

संदर्भ :- या सचिवालयाचे परिपत्रक क्र.१६४१०/ब कक्ष, दिनांक ८ नोव्हेंबर, २०२३

सर्व मंत्रालयीन विभागांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानसभेच्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनाकरिता पहिल्या व दुसऱ्या आठवड्यातील विभागाकडे निर्देशित केलेले प्रश्न वस्तुस्थिती ग्राह्य धरुन दिनांक २१ व २२ डिसेंबर, २०२३ या दोन दिवसांकरीता तारांकित स्वीकृत करण्यात आले होते. तथापि, महाराष्ट्र विधानसभा कामकाज सल्लागार समितीच्या मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजीच्या बैठकीत सन २०२३ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनाचा कालावधी बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजीपर्यंत निश्चित करण्यात आल्यामुळे उक्त दिनांक २१ व २२ डिसेंबर, २०२३ रोजीकरिता तारांकित स्वीकृत करण्यात आलेले प्रश्न फेरविचारांती अतारांकित स्वीकृत करण्यात आले आहेत. या अतारांकित प्रश्नांची उत्तरे म.वि.स. नियम ७२(२) अन्वये तीस दिवसाच्या आत या सचिवालयास पाठविण्यात यावीत.

तसेच दिनांक २१ व २२ डिसेंबर, २०२३ या दोन दिवसांकरिता आपल्या विभागाकडे अतारांकित म्हणून प्राप्त झालेल्या सर्व प्रश्न सूचना व्यपगत करण्यात आल्या आहेत.

(सीमा तांबे)
अवर सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति :

(१) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
(२) मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव
(३) मा.उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव
(४) मा.मंत्री यांचे खाजगी सचिव
(५) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
यांना माहितीसाठी तथा कार्यवाही अग्रेषित.

F:\२०२३\नागपूर अधिवेशन 2023 BACK UP\question dates laps fourth session २०२३.doc

Scanned with OKEN Scanner